वर्ष ४४
अंक ४

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

वृत्त 2.0
|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

**समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक**

एप्रिल २०२४
फाल्गुन/चैत्र
शके १९४५/१९४६



प्रिय मित्र मैत्रिणींनो,

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे २०२४चे अधिवेशन आता केवळ तीन महिन्यांवर येऊन ठेपले आहे!

बीएमएम २.० या संकल्पनेवर आधारीत आपण गेली दोन वर्षे बीएमएमचे immigrant-centric to Marathi -Settlement in North America - centric रूपांतर करत आहोत. १०-१५ जणांच्या कार्यकारिणीचे स्वरुप गेल्या दोन वर्षात २५० स्वयंसेवकांच्या कार्यकारिणीत बदलले आहे आणि ही २५० स्वयंसेवकांची संघटना आज ३० हून अधिक उपक्रम आपल्या मराठी समाजासाठी जोमाने राबवत आहे.


या बीएमएम २.० संकल्पनेवर आधारीत आपण प्रकाश भालेराव यांच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या बीएमएम अधिवेशनामध्ये देखील काही आमूलाग्र बदल करत आहेत. १) बृहन्महाराष्ट्र मंडळांच्या इतिहासात पहिल्यांदाच आपण मंडळाच्या मार्फत तिकीट विक्री करत आहोत. २) उत्तर अमेरिकेतील प्रत्येक कार्यक्रमाची entry आपण मंडळांच्या मार्फतच स्वीकारली आहे. ३) आपल्या समाजातील ज्येष्ठांसाठी (७५+) आपण main hall मध्ये बसण्यासाठी वेगळी जागा राखून ठेवत आहोत ४) बृहन्महाराष्ट्र मंडळांच्या इतिहासात पहिल्यांदाच आपण भारताबाहेरील मराठी मंडळांच्या नेतृत्वाची बृहन्महाराष्ट्र मंडळांच्या अध्यक्षतेखाली परिषद आयोजित करत आहोत ५) बृहन्महाराष्ट्र मंडळांच्या इतिहासात पहिल्यांदाच आपण एक संपूर्ण दिवस बीएमएमच्या सामाजिक कार्यक्रमांसाठी राखून ठेवला आहे - ज्याला २५० जणांच्या कार्यकारिणीने बीएमएम फेस्ट (BMM Fest) हे नाव दिले आहे!

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनामध्ये मनोरंजक कार्यक्रम, मित्र-मैत्रिणींच्या भेटी गाठी आणि मस्त झकास जेवण महाराष्ट्रातल्या तुमच्या घरच्या समारंभांची आठवण नक्कीच करून देईल याची मला खात्री आहेच, पण त्याच बरोबर आपण आपल्या सामाजिक उपक्रमांचा - शाळा, युवा, रेशीमगाठी, उत्तररंग, बी-कनेक्ट, कम्युनिटी outreach, फिलॉसॉफी, मेडिटेशन, women empowerment, outdoors इ. देखील सखोल आढावा घेणार आहोत आणि या सर्व महत्त्वाच्या उपक्रमांना उत्तर अमेरिकेतील - महाराष्ट्राबाहेरील सर्वात मोठे व्यासपीठ - बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन - उपलब्ध करून देत आहोत!

यावर्षी पहिल्यांदाच होत असलेल्या बीएमएम फेस्ट मध्ये आपले २५० हून अधिक स्वयंसेवक गेले दोन वर्ष किती मोठ्या प्रमाणात कसे व काय काम करत आहेत हे बघणार आहोत. या सगळ्यांचे जेवढे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. बृहन्महाराष्ट्र मंडळाचा अध्यक्ष म्हणून माझ्यासाठी सर्वात अभिमानाची गोष्ट म्हणजे माझ्या या विस्तारित कार्यकारीणीचे हे प्रचंड मोठे व्यापक काम. या सर्वांबरोबरचा प्रवास ही माझ्यासाठी भाग्याची गोष्ट आहे. तुम्ही देखील या सगळ्या स्वयंसेवकांना प्रोत्साहन देण्यासाठी, बृहन्महाराष्ट्र मंडळ जे सामाजिक कार्य करत आहे त्याची माहिती करून घेण्यासाठी आणि त्याचा आपल्या समाजाला, आपल्या सगळ्यांना - आजच्या तसेच उद्याच्या पिढीला - कसा फायदा होत आहे हे जाणून घेण्यासाठी बीएमएम फेस्टला तुमचे एक सामाजिक कर्तव्य म्हणून यावे अशी माझी मनापासून इच्छा आहे. तुम्ही सगळे मोठ्या संख्येने उपस्थित रहाणार याची मला खात्री आहे. लवकरच भेटू या तर मग  सॅन होजे मध्ये जून २७ ते ३० दरम्यानच्या २१ व्या बृहन्महाराष्ट्र अधिवेशनामध्ये!

**काही महत्त्वाच्या links:** https://bmm2024.org/register/
https://bmm2024.org/bmm2024-fest/
https://bmm2024.org/north-america-programs/
https://bmm2024.org/india-programs/
https://bmm2024.org/competitions/
https://bmm2024.org/individual-donor-packages/
https://bmm2024.org/bmm-patrons/

आता सांख्य-कारिकेतील एका श्लोकाने थांबतो:
सर्वं प्रत्युपभोगं यस्मात् पुरुषस्य साधयति बुद्धिः । सैव च विशिनष्टि पुनः प्रधानपुरुषान्तरं सुक्ष्मम् ॥
(सर्व ज्ञानेंद्रिये त्यांना जे ग्रहण होते ते पुरुषापुढे ठेवता येईल या हेतूने बुद्धीपर्यंत पोहोचवतात) कारण बुद्धी पुरुषाच्या अनुभवांची पुर्ती करते आणि बुद्धीलाच प्रकृती आणि पुरुष यांच्यातील सूक्ष्म अंतर कळू शकते.
शुभेच्छा,



संदीप दीक्षित, *अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ २०२२-२४*
+1-216-926-6696 sandeep.dixit@bmmonline.org
twitter.com/sandeepsdixit
www.bmmonline.org
bmm2.org/app
#bmm2 #bmm2024 #communityCentricBMM #mandalMember #vruttaSubscriber

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)
संस्थापक:- कै . विष्णु वैद्य, कै . शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर

अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
ईमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-
BMM Treasurer - Rajan S Pednekar
20611 Whitebud CT. Tampa FL 33647
Ph- 813-546-1330
Email: Rajan.Pednekar@bmmonline.org

**वर्गणीचे दर**:- $25/ year
Subscription payment is accepted online by Paypal:
https://www.bmmonline.org/vrutta/subscription

**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२२ - २०२४)**

**मताधिकार असलेले सदस्य**

अध्यक्ष: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो
सचिव: अजित नातू, सॅक्रामेंटो, कॅलिफोर्निया
कोषाध्यक्ष: राजन पेडणेकर, टॅम्पा बे, फ्लोरिडा
सदस्य: अमर उन्हेकर, लिविंगस्टन, न्यु जर्सी
सविता मोरे, वॉशिंग्टन
मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा
प्रसाद पानवळकर ऑस्टिन, टेक्सस
विराज राऊत, सॅन होजे, कॅलिफोर्निया

**नियुक्त सदस्य**

माजी अध्यक्ष: विद्या जोशी, शिकागो, इलिनॉय

**विश्वस्त समिती**

अध्यक्ष : मोहित चिटणीस, सिऍटल, वॉशिंग्टन
सदस्य: नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
सदस्य: सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट
प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

## या अंकात

| | |
|---|---|
| अध्यक्षीय | १ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक समिती | २ |
| स्वप्नांची बेफाम भरारी | ३ |
| कविता - निसर्ग...! | ४ |
| बृ. म. मंडळ २०२४ अधिवेशन रूपरेषा | ५ |
| बृ. म. मंडळ २०२४ अधिवेशन रूपरेषा | ६ |
| बृ. म. मंडळ २०२४ अधिवेशन रूपरेषा | ७ |
| बृ. म. मंडळ २०२४ अधिवेशन रूपरेषा | ८ |
| बृ. म. मंडळ २०२४ अधिवेशन रूपरेषा | ९ |
| बृ. म. मंडळ २०२४ अधिवेशन रूपरेषा | १० |
| बृ. म. मंडळ २०२४ अधिवेशन रूपरेषा | ११ |
| बृ. म. मंडळ २०२४ अधिवेशन रूपरेषा | १२ |
| स्थलांतर - त्यांचे vs आपले | १३ |
| कविता - दाता...... | १४ |
| जाहिरात | १५ |

## संपादक समिती

अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत
कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
राजन पेडणेकर

हया अंकाबाबत तुमचे मत नक्की कळवा.

Email - Vrutta@Bmmonline.org

आलेल्या प्रतिक्रिया पैकी, निवडक प्रतिक्रिया पुढच्या अंकात प्रसिद्ध केल्या जातील. **शब्दमर्यादा: १०० शब्द.**



# स्वप्नांची बेफाम भरारी

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या २०२४ सालच्या सॅन होजे येथे भरणाऱ्या अधिवेशनाचे वारे आता सर्व उत्तर अमेरिकेत वाहू लागले आहेत. या अधिवेशनातील **'ड्रीम्स UNLIMITED'** हा शुभारंभाचा कार्यक्रम कसा असणार आहे याची उत्सुकता सगळ्यांना आहेच. त्या संदर्भात कार्यक्रमाच्या रचनाकार निर्मल गोसावी यांच्याशी केलेली बातचीत:

**अनिता:** निर्मलताई, मनःपूर्वक अभिनंदन! 'ड्रीम्स UNLIMITED' या शुभारंभाच्या कार्यक्रम मागील भूमिका जाणून घ्यायला आमच्या वाचकांना आवडेल.

**निर्मलताई:** खूप खूप धन्यवाद! स्वप्न हा मनुष्याचा धर्म आहे, प्रत्येकाला स्वप्न पडतात, ज्यांत केवढ्या मानवी भावनांचा आविष्कार होतो! आनंद, प्रेरणा, दुःखातून बाहेर पडण्याची ताकद... एका कलाकाराला ह्या विषयावर सादर करण्यासारखं खूप काही आहे. त्यामुळे स्वप्न या सूत्रावर कार्यक्रम करायचं असं एक स्वप्न माझ्या मनात होतंच. ते अधिवेशनाच्या निमित्ताने साकार होत आहे. आपलच बघ ना, अमेरिकेत आलेला प्रत्येक माणूस काहीतरी स्वप्न उराशी बाळगून आलेला असतो. वेगळ्या पिढीची वेगळी स्वप्ने! त्यामुळे सगळ्यांनाच या सूत्राविषयी आपलेपणा वाटणार आहे. आणि स्वप्नात काहीही होऊ शकते, नाही का? कल्पनाशक्तीचा एक मोठा कॅनव्हास आपल्यासमोर या कार्यक्रमातून उलगडणार आहे. यात नाट्य आहे, रंग आहेत, भावना आहेत. एक भारावून टाकणारा, आयुष्यव्यापी, अविस्मरणीय आणि नेत्रदीपक कार्यक्रम आम्ही सादर करणार आहोत. Eleanor Roosevelt यांचं एक वाक्य माझ्या मनावर कोरलं गेलं आहे: "Future belongs to those who believe in their dreams." कोविड मधून बाहेर पडल्यानंतर, एक नवी अस्मिता घेऊन आपण भविष्यात जी नवी भरारी घेणार आहोत त्याचेच हे प्रतीक असेल.

**शीतल:** ह्या कार्यक्रमाचे स्वरूप कसे असेल?

**निर्मलताई:** Broadway च्या धर्तीवर आधारलेली ही एक संगीतिका असेल. नाट्य, संगीत आणि नृत्याद्वारे आम्ही आपल्या सगळ्यांच्या स्वप्नांची गोष्ट सांगणार आहोत. माझ्या कल्पनांवर आधारलेली, नचिकेत जोग यांची संहिता, तुम्हाला अगदी पहिल्याच प्रवेशापासून एका अनोख्या जगात घेऊन जाईल. कार्यक्रमाचे नाट्य दिग्दर्शन केले आहे हेमांगी वाडेकरने तर यातील युवा विभागाची संकल्पना, लेखन आणि दिग्दर्शन केले आहे नव्या पिढीचे कलाकार, चैतन्य कर्वे, राधिका गोसावी, अभिराम वाडेकर आणि ऋचा वाडेकर यांनी. तसेच मुकुंद मराठे, विजय केंकरे, सुकन्या कुलकर्णी मोने, आणि निपुण धर्माधिकारी यांनीही वेळोवेळी मोलाचा सल्ला दिला आहे.

**अनिता:** कार्यक्रमाचे संगीत वैशिष्ट्यपूर्ण असणारच...

**निर्मलताई:** निश्चितच! कार्यक्रमातील बहुतांश गाणी नवीन आहेत. ती लिहिली आहेत नचिकेत जोग यांनी तर संगीतबद्ध केली आहेत आमोद कुलकर्णी यांनी. विवेक दातार आणि आनंद कर्वे ही गाणी बे एरियातील गुणी कलाकारांच्या आवाजात ध्वनिमुद्रित करीत आहेत आणि त्यांच्यावर संगीताचे संस्कार पुण्यात होत आहेत. भारतीय संगीताला पश्चिमी बाज चढलेल्या या गाण्यांतून तुम्हाला शास्त्रीय संगीत, लोकसंगीत, चित्रपट-संगीत, ताल वाद्य, नृत्याचे बोल या सगळ्यांचा आस्वाद घेता येईल.

**शीतल:** कार्यक्रमाचे एक प्रमुख आकर्षण म्हणजे यातील नृत्ये! त्याबद्दल काही सांगाल?

**निर्मलताई:** रंगमंचावरील माझी सुरुवात गुरु पार्वती कुमार आणि गुरु रमेश पुरव यांच्या दिग्दर्शनाखाली गाजलेल्या "दुर्गा झाली गौरी" या नृत्य नाट्याने झाली. सुलभाताई आणि अरविंद देशपांडे, विजया मेहता, दामू केंकरे यांच्याकडून मी रंगमंचीय सादरीकरणाचे विविध पैलू आत्मसात केले. या सगळ्यांच्या आशीर्वादाने मी स्वतःची अभिव्यक्ती विकसित केली आहे. माझे नृत्य दिग्दर्शन हे कथेशी निगडित असते. लोकनृत्य, चित्रपट नृत्य, semi classical and contemporary यांच्यावर आधारित असलेल्या रचनांद्वारे मी ही कथा वैविध्यपूर्ण रंगांत सादर करणार आहे. कलाकारांच्या वेशभूषेवरही आम्ही विशेष मेहनत घेत आहोत.



**अनिता:** नेपथ्य आणि प्रकाशयोजना हे अशा संगीतिकांना एका वेगळ्याच स्तरावर नेतात...

**निर्मलताई:** कलाकृतीला पोषक असे नेपथ्य कसे असावे, याचे शिक्षण मला प्रदीप मुळे यांच्याकडून मिळाले. याही कार्यक्रमात ते सल्लागार म्हणून सामील आहेत. पंचम स्टुडिओच्या मुक्तक मावळ Interactive LED च्या साहाय्याने अचंबित करणारी खास प्रकाश योजना आखीत आहेत. बे एरियाला साजेल असे आधुनिक तंत्रज्ञान वापरून आयोजित केलेले लक्षवेधक नेपथ्य आणि आकर्षक प्रकाश योजना प्रेक्षकांच्या पसंतीला नक्कीच उतरतील.

**शीतल:** बृ. म. मं वृत्त विभागाकडून तुम्हाला आणि तुमच्या सगळ्या चमूला अनेकोत्तम शुभेच्छा!

**निर्मलताई:** खूप खूप आभार! याआधी १९९९ साली झालेल्या अधिवेशनात 'खेळ मांडियेला' या कार्यक्रमाचे नृत्यदिग्दर्शन करण्याची तर २०१७ साली झालेल्या अधिवेशनात 'शक्तिरूपेण' ही कलाकृती सादर करण्याची संधी आम्हाला मिळाली होती. या वेळी वय-वर्षे १०-६० मधील शंभराहून अधिक कलाकार 'ड्रीम्स UNLIMITED' हा शुभारंभाचा कार्यक्रम रंगतदार आणि स्मरणीय करण्यासाठी झटत आहेत. विजया मेहता, गुरु पार्वतीकुमार, अरविंद आणि सुलभा देशपांडे यांच्याकडून मला मिळालेली तालमीतील शिस्त, तेही अंगी बाणवित आहेत. तुमच्यासाठी स्वप्नांची "बे"फाम भरारी घेऊन आम्ही येत आहोत, तेव्हा तुम्हीही आमच्याबरोबर स्वप्नांच्या दुनियेत सफर करायला जरूर या.




अनिता कांत, सॅन रमोन
Anita.kant@bmmonline.org

शीतल रांगणेकर, लॉस अँजेलिस
Sheetal.Rangnekar@bmmonline.org


## निसर्ग...!

निसर्गाची किमया, न्यारीच भासे, तेच दृश्य, उलगडती भाव निराळे.
कधी निसर्ग करतो रंगांची उधळण, कधी, मनात उरते
फक्त आठवण...!
अवनी नेसून, शालू गर्द हिरवा, हाती भरते, रंगीत फुलांचा चुडा.
कधी पांघरून, शुभ्र बर्फाची चादर, नितांतरम्य रुप तिचे,
करते सादर...!
निसर्गाची रुपे ही, वेगवेगळी जरी, त्यातून शिकण्याजोगे असे,
बरेच काही, एकसमान नसते कधी, आयुष्य जरी,
हसत सामोरे जावे, आयुष्यास तरी...!


शुभदा जोशी-पारखी
shubhada.s.joshi@gmail.com


**राशिभविष्य : एप्रिल २०२४**

**अजय तनखीवाले**

https://bmmonline.org/rashi-bhavishya/






मंडळी, आजच कॅलेंडरवर मार्क करा बरं - **27 जून ते 30 जून, 2024** या दिवशी sunny कॅलिफोर्नियाच्या सॅन होजेमध्ये आपलं अधिवेशन भरणार आहे आणि आपल्या सर्वांना त्याचं आग्रहाचं आमंत्रण आहे. BMM 2024 चे अधिवेशन म्हणजे मराठी साहित्य, कला, आणि संगीताचा उत्सव, अस्सल मराठमोळ्या खाद्यपदार्थांची रेलचेल, ढोल-ताशांचा गजर आणि हजारो मराठी माणसांचा मेळावा! तुमच्या सर्वांचा भरघोस प्रतिसाद मिळेल अशी अपेक्षा आहे. तर मग आता वाट कसली पाहताय, आजच नावनोंदणी करा.

## AUDITIONS OPEN!













*To participate and learn more visit : https://bmm2024.org/competitions/*

# LEGENDARY PERFORMANCES AWAIT!



























*To participate and learn more visit : https://bmm2024.org/bay-yuva/*

https://bmm2024.org/india-programs/

BMM2024

KAAYBAY | PROGRAMS | SCHEDULE | FUNDRAISING | काय खाणार बे?

REGISTER NOW

Less than 900 tickets left!

# INDIA PROGRAMS

Exciting Announcement

## The Moment We've All Been Waiting For!

After an overwhelming response to our Request for Proposal and a meticulous selection process vetted at multiple levels, we are thrilled to unveil the stellar lineup of programs at the BMM2024 convention!



# UNVEILING THE NORTH AMERICA PROGRAMS



बृहन्महाराष्ट्र मंडळ

## सादर करत आहोत व्यावसायिक, शैक्षणिक, सामाजिक, वैज्ञानिक, मनोरंजक, गंभीर अशा विविध छटा.
















# GET YOUR TICKETS

We have curated fundraising packages and general ticket registration options to meet the needs of every attendee

**Less than 900 tickets left!**

## PATRONS


Curated for long-time donors who have been associated with BMM in the past and passionate individuals and families who want to join us in our efforts.

## SPONSORS

Curated for enterprises and patrons seeking visibility for their brand amongst the affluent and influential 6000+ global attendees at the convention.

## GENERAL TICKETS

Our tickets are selling fast. Let's spread the word and get your friends and close ones to join the fun with you. Register now to secure your spot.



# PATRONS PACKAGES 2024($)

Less than 900 tickets left!

| | DIAMOND | PLATINUM |
|---|---|---|
| • COST OF PACKAGES | 25000 | 15000 |
| • NO. OF TICKETS | 6 | 4 |
| • SEATING (2 SEATS PER SOFA) | PREMIUM SOFA | PREMIUM SOFA |
| • NO. OF BANQUET TICKETS | 6 | 4 |
| • HOTEL ROOM | 3 | 2 |
| • HOTEL TYPE | PRIORITY | PRIORITY |
| • DAY 1 (BMM FEST) | INCLUDED | INCLUDED |
| • CELEBRITY DINING | 6 | 4 |
| • SPECIAL BENEFIT* | CELEBRITY PHOTO OP | CELEBRITY PHOTO OP |
| • SPECIAL BENEFIT* | BE A FELICITATOR AT 2 PROGRAM | BE A FELICITATOR AT 1 PROGRAM |
| • WITHOUT HOTEL OPTION | N/A | N/A |
| • TAX DEDUCTABLE DONATION PERCENTAGE | APPROX. 73% | APPROX. 70% |
| • UPGRADABLE | YES* | APPROX. 30% |

**Please Note**

This offer is for limited time only. Once the required amount of seats are sold, these packages will not be available for purchase

**About Special Benefits**

Celebrity dining will be in a separate designated area reserved for only package holders for all the meals during the convention
Celebrity Photo Op; Exclusions apply
Special benefit being a felicitator involves welcoming the artists and/or giving away prizes

For any specific questions or further concerns, please write to Anjali Gandhi, Fundraising Lead, BMM2024 at sponsorship@bmm2024.org

## INDIVIDUAL DONOR PACKGES

| | PLATINUM MINI | GOLD | GENERAL TICKETS |
|---|---|---|---|
| • COST OF PACKAGES | 7500 | 3000 | 500 |
| • NO. OF TICKETS | 2 | 2 | 1 |
| • SEATING (2 SEATS PER SOFA) | PREMIUM SOFA | REGULAR SOFA | CHAIR |
| • NO. OF BANQUET TICKETS | 2 | N/A | N/A |
| • HOTEL ROOM | 1 | 1 | ADD-ON |
| • HOTEL TYPE | PRIORITY | VICINITY* | VICINITY |
| • DAY 1 (BMM FEST) | INCLUDED | INCLUDED | ADD-ON |
| • CELEBRITY DINING | 2 | 2 | N/A |
| • SPECIAL BENEFIT* | CELEBRITY PHOTO OP | N/A | N/A |
| • SPECIAL BENEFIT* | BE A FELICITATOR AT 1 PROGRAM | N/A | N/A |
| • WITHOUT HOTEL OPTION | N/A | DISCOUNT $300 | N/A |
| • TAX DEDUCTABLE DONATION PERCENTAGE | APPROX. 67% | APPROX. 30% | NO |
| • UPGRADABLE | YES | YES | YES |

For any specific questions or further concerns about our individual donor packages, please write to individualdonors@bmm2024.org

*Terms and conditions apply

# Corporate Sponsorship Opportunities

Curated for enterprises and patrons seeking visibility for their brand amongst the affluent and influential 6000+ attendees

| Corporate Sponsorship Benefits | Level 1 | Level 2 | Level 3 | Level 4 | Level 5 |
|---|---|---|---|---|---|
| Cost | $15,000 | $25,000 | $50,000 | $100,000 | $250,000 |
| Recognition on Main Stage | – | – | Yes | Yes | Yes |
| Special Benefit *** | Slide on Main Stage | Level 1 + 30 sec Video | Level 2 + One Program | Level 3 + 1 Full Day | All 3 days |
| BizCon Sponsorship | – | – | Yes | Yes | Yes |
| BizCon Tickets | 2 | 4 | 6 | Negotiated | Negotiated |
| EXPO Booth | 10×10 | 10×10 | 10×10 | 20×10 | 20×10 |
| Virtual Sponsor Booth | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| BMM Admission Tickets | 2 | 4 | 6 | | |
| Seating | Gold | 2 Sofa + 2 Gold | 2 Sofa + 4 Gold | | |
| Banquet, and Celebrity Dinner | 2 | 4 | 6 | Negotiated | Negotiated |
| Hotel Room ** | 1 | 2 | 3 | | |
| Hotel Room Type | Vicinity* | Vicinity* | Priority | | |
| BMM2024 Newsletter | – | – | – | Yes | Yes |
| BMM2024 Website / Logo | Logo | Logo | Logo | Full page | Full page |
| BMM2024 Smarnika | 1/4 page | 1/4 page | 1/2 page | Full page | Inside Spread |

https://bmm2024.org/bmm-sponsors/

# EXPO BOOTH

Additional Virtual booth included

| | New Offering! Only Virtual Booth | 10x10 Zone B | Most Popular! 10x10 Zone A | 20x10 Zone A |
|---|---|---|---|---|
| Pricing | **$749** | **$2,399** | **$2,899** | **$5,199** |
| Virtual Booth | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| Pipe and Drape structure, Logo on expo website, Signage | - | ✓ | ✓ | ✓ |
| Tables and Chairs | - | 1 each | 1 each | 2 each |
| General Admission Tickets | - | 1 | 1 | 2 |
| Close to High Traffic Areas | - | × | ✓ | ✓ |
| Close to Attractions | - | ✓ | ✓ | ✓ |
| | Only Virtual Booth | 10x10 Zone B | 10x10 Zone A | 20x10 Zone A |
| **Select Quantity** | 0 | 0 | 0 | 0 |




https://bmm2024.org/bmm2024-expo/

## स्थलांतर - त्यांचे vs आपले

शनिवार सकाळ. पांघरूणातूनच निसर्ग सफर करण्याचा सोपा उपाय म्हणजे, Our Planet ही नेटफ्लिक्स वरची सिरीज बघणे. एअरपोर्ट वर जशी माणसांची गर्दी असते, तसे हे स्थलांतर करणारे पक्षी एका झाडावर एका ठिकाणी एकत्र येतात, आणि मग, त्यांच्या फ्लाईट ची वेळ झाली की, स्वतःच सामूहिक विमानाचा आकार करतात आणि उडायला लागतात. तसे हे विमानाच्या पंखांच्या आकाराचे पक्ष्यांचे थवे आकाशात दिसतात. जशी वेगवेगळी विमाने वेगवेगळ्या आकारांची आणि रंगांची असतात, तसे यांच्या विमानाचे आकार वेगवेगळे असतात. हे असे हजारो मैलांचा प्रवास करतात.

माणूस स्वतःची महत्वाकांक्षा जोपासण्यासाठी सातासमुद्राकडे येतो आणि दुसऱ्या देशात येऊन थंडीने कुडकुडतो, हे पक्षी फक्त भुकेकरता आणि उबदार वातावरणाकरता उडत असतात. या मायग्रेशन मध्ये रानटी गाई, बैलं, झेब्रे पण हजारो मैल चालतात. विमानात आपण मस्त TV बघत, खात खात येत असतो. हे मात्र जीवावर बेतलेले वातावरण आणि वाटेत यांना खाण्यासाठी वाट बघत असलेले वाघ सिंहासारखे भक्षक, यांची नजर चुकवत चालत असतात. “हा रूट जास्तं सेफ आहे” असं एकमेकांशी बोलतात. “त्या रूटवर ते ३-४ सिंह फारच भुकेले असतात, तिकडे नको! इकडून गेलात तर, नदी पार करून जायला लागेल! नदीचं काही नाही रे! वाटेत मगरी असतात वाट बघत!” हा त्यांचा संवाद!



लहानपणी अशी पक्षांची लाईन आकाशात दिसली की मला ते दरवर्षी येणारे ‘वारकरी पोपट’ वाटायचे. क्वॅक क्वॅकच्या भजनी ठेक्यात भजनं म्हणत रंगून गेलेले असायचे. हे करत असताना ते पंखांच्या टाळ्या वाजवत आहेत का काय अशी मला शंका यायची. मला वाटायचं हे पंढरपूरला जाऊनच विसावा घेणार. परंतु यांना विठोबाच्या ऐवजी पोटोबा महत्वाचा, त्यामुळे ते अन्नाच्या शोधात जग पालथं घालतात.

आपण साऱ्या कुटुंबाला, आई वडलांना सोडून येतो. हे सगळ्यांना घेऊन येतात. मुलगी बघायला परत भारतात गेला, हा प्रकार नाही, मुली पण बरोबर असतात. या जग प्रवाशांना पोचायला कित्येक महिने लागतात. त्यामुळे या प्रवासात यांची लग्ने होतात, त्यांना मुलं वैगेरे पण होतात. त्यामुळे ‘जाताना दोघं, येताना तिघं’ सारखे ‘जाताना शेकडो, येताना हजारो’ अशी परिस्थिती. कल्पना करा, आपल्या जहाजांना पोचायला असेच कित्येक महिने लागले असते, तर चढलेले प्रवासी थोडे, उतरलेले जास्त असं झालं असतंच ना! आपली मुले कोणत्या देशाची नागरिक आहेत हे कदाचित त्या जहाजाच्या स्थानावरून ठरलं असतं.

आपण अभ्यास आणि शिक्षण करून, interview ची तयारी करून परदेशात जॉब मिळवतो. परंतु हे प्राणी पक्षी जन्मजात सर्वज्ञानी असतात. आपण इथे आल्यावर ग्रीन कार्ड, सिटिझनशिप घेऊन इथेच मायग्रेट होऊन पर्मनंट इमिग्रंट होतो, पण ते बरेचसे इमाने इतबारे प्रत्येक वर्षी आपल्या देशात परत जातात. मागच्या वर्षी युरोपला गेलो होतो, या वर्षी अमेरिका जाऊ बघायला, हा प्रकार नाही, ते तिथेच परत येतात.

छे! कंटाळा आला बुवा उडून, आता बस किंवा रेल्वे करू, असं म्हणून काही पक्षी चालणाऱ्या प्राण्यांचा पाठीवर बसून प्रवास करतात. हे रेल्वे बुकिंग ते कसं करतात कोणास ठाऊक! आपल्या बस मध्ये किती जण बसले आहेत, त्याची त्या ड्राइवरला, म्हणजे चालणाऱ्या प्राण्याला सुतराम कल्पना नसते. आपण कसे विचारतो, “तू कुठल्या फ्लाईटने चाललाय ?” तसे हे एकमेकांना विचारतात “तू कुठल्या म्हशीवरून जाणार आहे? ओह ती म्हैस का? मी तिच्या रेड्याच्या पाठीवर आहे, भेट होईलच, मस्त मजा करू!” मग हे गाण्याच्या भेंड्या खेळत मजेत प्रवास करतात.

जंगली गाई, झेब्रा, antelope तर प्रवास करतातच, परंतु हत्ती सारखे प्राणी पण तीन तीन हजार मैल चालतात. तरी पण weight loss का होत नाही, हा यांना कायमच्या पडलेल्या प्रश्नावर चर्चा करत चालतात. माणूस जातीचा प्रॉब्लेम, अल्बाट्रॉस पक्षांमध्ये पण आहे बरंका! यांच्या पिल्लांचे वडील अन्नाच्या शोधात ५ वर्ष उडायला जातात. आजूबाजूला जमीन नाही. उडत असताना दमले आणि पाण्यात बसले की खालून शार्क मासे यांना खातात. हे शार्क म्हणजे कॉर्पोरेट कंपन्यांसारखे, जरा काम स्लो झालं, की तुमचा जीव गेला. शेवटी पक्षी अन्न घेऊन परत येतात तेंव्हा, पिल्लांबरोबर शून्यापासून बॉण्ड निर्माण करावा लागतो! आणि खाण्याच्या पदार्थांऐवजी चुकून प्लास्टिक आणलं म्हणून, बायकोची बोलणी खातात! भाजी बघून आणायची ना!?

मायग्रेट होणाऱ्या पांढऱ्या अस्वलाचं फारच वाईट वाटलं बुवा! हे सील रुपी अन्नाच्या शोधात भटकत असतात! आणि हे सील

लपंडाव खेळत असल्यासारखे टुणकन उडी मारून पाण्यात गुडूप! भोज्जा द्यायच्या आतच हे गायब! आत्ता इथे होता, तो गेला कुठे? पाण्यात, वरती तोंड काढून हे सील बिचाऱ्या भुकेल्या अस्वलावर हसतात. या पांढऱ्या कडे बघून मला मी अमेरिकेत एकटा आल्यावरच्या अनुभवाची पण आठवण झाली. एक तर इथे त्या अस्वलासारखे एकटं वाटायचं, आणि इकॉनॉमी डाउन असल्याने, प्रोजेक्टची संख्या त्या सील माश्यांसारखीच कमी झाली होती. जरा प्रोजेक्ट बघायला गेलं, की ते पाण्यात (की पुण्यात?) गुडूप!

आपण विमानातून १०-१२ हजार मैल प्रवास करून दमतो. हे व्हेल मासे आणि काही पक्षी, ६५००० मैल प्रवास करतात. आणि क्रील माशांच्या आनंदवनात येतात! क्रील मासे सुद्धा "इतका दूरचा प्रवास करुन आलाय - आता जेवण करून जा आमचं!" असं म्हणून स्वतःलाच ताटात वाढतात. व्हेल मासे ढेकर दिल्यासारखा जेव्हा पाण्याचा फवारा हवेत सोडतात, तेव्हा या क्रील माश्यांना पाहुण्यांचे आदरातिथ्य केल्याचं समाधान मिळते.

कष्टकरी मधमाश्या मध गोळा करण्याकरिता जे फिरतात, त्याचे हजारो मैल होतात म्हणे. थोडक्यात काय आपण भारतात असताना असेच रात्रंदिवस काम करतो. काहीतरी मोठी संधी मिळेल म्हणून. मग काही कमर्शिअल पोळी करणाऱ्यांचा आपल्यावर डोळा असतो. ते मग आपल्याला H-१ नावाच्या एका पोळ्याची लालूच दाखवतात. आपण ग्रीन कार्ड होई पर्यंत या एका कंपनीच्या पोळ्यामध्ये रात्रंदिवस काम करतो. या पोळ्यामधे आणि स्थलांतरीत देशामध्ये आपण स्थायिक होतो.

परंतु या कामकरी माश्या जशा ह्या नवीन कर्मभूमीमध्ये सुद्धा आपलं काम करत स्वतःच मध निर्माण करत राहतात आणि सगळ्या जगाला त्याचा पुरवठा करतात. तसे आपण पण आपले सर्वस्व या नवीन कर्मभूमीला देतो. त्याला अड्जस्ट होतो. आपल्या भारतीय बुद्धिमत्तेचं गोड मध संपूर्ण जगात पसरतं!

काही मासे मायग्रेट झाल्यावर नव्या पाण्यामधे स्वतःचे रंग बदलतात. काही पक्षी नवे कौशल्य शिकतात. काही प्राणी पिल्लांकरिता तेथेच राहतात. तसेच आम्ही पण नव्या कर्म भूमीची परतफेड करतो, स्वतः तिथल्या नवीन संस्कृतीला आपलेसे करतो, त्यांची भाषा शिकतो, त्यांचे खेळ बघतो, त्यांचं म्युझिक, त्यांचं खाणं आपल्या संस्कृतीशी एकत्र करून नवीन काहीतरी निर्माण करतो. इथल्या सामाजिक प्रश्नामध्ये सहभाग घेतो, आपल्या 'दोन सेन्ट्स' चं योगदान करतो.

माझ्या लहानपणीच्या वारकरी पोपटांसारखे सारखे 'वारकरी NRI' म्हणून येतो, परंतु इथेच राहून, परदेशात आम्ही आमची स्वतःची 'पंढरी' निर्माण करतो! "गणपती बाप्पा मोरया" च्या जल्लोषात सिलिकॉन व्हॅली दुमदुमवतो!!

**सुधीर धर्माधिकारी**

Sudhir.dharmadhikari@gmail.com

## दाता......

सोनेरी सडा...शिंपडायचा तरी किती?
केशराचा साठा....नजरेत साठवायचे तरी किती?
चंदेरी खजिना ....लुटायचा तरी किती?
या मनोहरी आकाशाला,
नजरेत साठवायचे तरी किती?

रंगीत पक्ष्यांनी...किलबिलायचे तरी किती?
शुभ्र झऱ्यांनी...झुळझुळायचे तरी किती?
माडांनी ताल...धरायचा तरी किती?
या अलौकिक संगीतामुळे,
कानांनी तृप्त व्हायचे तरी किती?

सुंदर फुलांनी...फुलायचे तरी किती?
विविध रंगांनी...उधळायचे तरी किती?
मंद सुवासानी...दरवळायचे तरी किती?
या रंगीबेरंगी दुनियेने,
मंत्रमुग्ध व्हायचे तरी किती?

निसर्गाने ....द्यायचे तरी किती?
ओंजळीत...घ्यायचे तरी किती?
नतमस्तक.... व्हायचे तरी किती?
कृतज्ञतेने पांग...आपण फेडायचे तरी
कसे.....आणि....किती ?

**चित्रा मेहेंदळे**

camehendale@gmail.com

**NAMASKAR** 🙏

Charity giving to any entity in India is now easy with Foundation for Small Charities India, Inc. (FSCI) Granted by IRS A (501 (C)(3) Tax Exempt Status. An affiliate 'Foundation for Small Charity' (FSC) has the 80-G and FCRA required Registration in India, allowing you to give at will, without any red tape. India recipients of your giving need not be a registered charity. Your school or college never attempted to obtain tax exemption in India, which is very
expensive.

We welcome repatriation of after-tax sales proceeds of realty by US Citizens of Indian origin. We will honor remittance of tuition fees by parents to colleges in the USA for their children from India.

**FSC is the answer.**
**Visit our Website "WWW.SmallCharity.Org", for more detail.**

**Or email to Admin@SmallCharity.Org .**

You will hear from Ramesh Sarva, CPA, 183 Broadway, #210, Hicksville NY 11801

## Join Donor List:

JAGDISH & SHUBHANGI THAKUR
RAVI & NILIMA BHIRUD
RAHUL & PUNAM MUTHA
KOTESWARA RAO KUNDA, MD
KIRAN& NNDINI JOAG
KISHOR DANDEKAR
SUBHASH & VASANTI PURANIK
SUHASINI JOSHI
KAMLAKAR &ARUNA PENDSE
PRAMILA SARVA
VIJAY NARINGREKAR
MUKUND & SHAILA DIDOLAKE
GOVIND & BHAKTI NADKARNI

SHARAD PANJAPE
KAMALAKAR PENDSE
SUHASINI JOSHI

SWAROOP YOG & OTHER CHARITIES
M. KARVE FONDN 16 NEW GIRLS EDU
ANAND RISHI Hosp. C T SCAN
EDUCATIONAL FOUNDATION, A.P.
V.T. PATIL FOUNDATION
AMPTE FOUNDATIO
CASP, V.S. SAMITHI, PUNE, PATHAK RST
KOSMIC BEATS
ATHASHREE
ADHAR
EDUCTION
AKKA DHOPESWAR MAHILA MANDAL
SHANTA DUEGA TEMPLE, KAVLEM, GOA
LD ENGG COLLEGE, LIBRARY REDEVALOPMENT
ATHASHREE, IMROVE FACILITIES FOR SENIORS
ATHASHREE
COSMIC BEATS

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

|| मराठी तितुका मेळवावा ||

**Subscription Remittance Address:**

**BMM Newsletter**
**20611 Whitebud CT.**
**Tampa FL 33647**


BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ

**Reshimgathee**



नाते जुळते मनाशी मनाचे



A BMM Matrimonial initiative for Maharashtrians in North America

https://reshimgathee.bmmonline.org/

BMM मराठी शाळा

Five-level "Marathi Language Learning" progressive curriculum, study guidelines and supporting materials.

The BMM-Bharti Vidyapeeth's joint certificates for "Marathi Bhasha" examinations after successful completion of each level and passing criteria.

For BMM Marathi Shala inquiries
Email : Shala@bmmonline.org

https://bmmshala.net/

## स्कूल बस (भाग - १)

पर्लब्रूक, नेवाडा येथील थाई बुद्धिस्ट मंदिराच्या एका सभागृहात इंतिरा सुवन्नरत ह्यांचे पार्थिव एका शवपेटीत दर्शनासाठी ठेवण्यात आले होते. शवपेटी भोवती फुलांची सजावट करण्यात आली होती. मागे बुद्धाचा एक फोटो ठेवला होता. त्याच्यापुढे काही उदबत्त्या लावण्यात आल्या होत्या. लाऊडस्पीकर वर मंद आवाजात बुद्धाची स्तवनं चालू होती.

सभागृहात मांडलेल्या खुर्च्यांवर साधारण तीस एक माणसे बसली होती. काही दबक्या आवाजात कुजबुजत होती, तर काही त्यांचे फोन चेक करण्यात गुंतली होती. पहिल्या रांगेत अगदी मधोमध सेन वू आणि तिची मुलगी थाओ वू ह्या दोघी बसल्या होत्या. थाई प्रथेप्रमाणे दोघीही काळ्या रंगाचे कपडे परिधान करून आल्या होत्या. सेन चेहऱ्यावरून अतिशय स्तब्ध व निर्विकार वाटत होती पण अनेक आठवणींच्या लाटा तिच्या मनाच्या भिंतीवर आदळत होत्या.

इतक्यात काही बुद्ध पुजाऱ्यांसह इंतिरा ह्यांचे पती भूमिबोल सुवन्नरत सभागृहात आले आणि तिथे एकदम शांतता पसरली. सर्वांच्या नजरा भूमिबोल ह्यांच्यावर स्थिरावल्या. त्यांनी आपल्या बायकोचे दर्शन घेतले आणि कमरेतून झुकून नमस्कार केला. त्या धीरगंभीर वातावरणात दोन क्षण गेल्यावर तिथल्या एका स्वयंसेवकाने त्यांना एका छोट्या व्यासपीठावर येऊन बोलण्याची विनंती केली.

"काल माझ्या बायकोचे वयाच्या ५२ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. या इहलोकातील तिचा प्रवास संपला. गेल्या १० वर्षांतील तिचा यातनामय प्रवास सुखकर करण्यात खूप लोकांनी मदत केली. त्यांचे मी मनापासून आभार मानतो. मला विशेष करून मानसोपचार तज्ज्ञ डॉ. सेन वू ह्यांचे आभार मानायचे आहेत. खरंतर त्यासाठी माझ्याकडे योग्य शब्द नाहीत. इंतिराची जीवनज्योत धगधगत ठेवण्यात त्यांनी अखेरपर्यंत साथ दिली. मानसिक शक्तीच्या अफाट सामर्थ्याचे दर्शन त्यांनी इंतिराच्या रूपाने घडवले. ते इतर सर्वांना नक्कीच प्रेरणादायी ठरेल."

सेनच्या कानांवर ते शब्द पडताच इतका वेळ दाबून धरलेला तिच्या मनाचा बांध फुटला. डबडबलेल्या डोळ्यांनी तिने मुलीकडे बघितलं. तिने हलकंच तिच्या आईच्या खांद्यावर हात ठेवून तिला थोपटलं.

मान खाली घालून सेनने डोळे टिपले. नकळत ती मनाने १० वर्षे मागे गेली होती.

ती एक मानसोपचार तज्ज्ञ म्हणून नेवाडा इथल्या पर्लब्रूक शहरात प्रॅक्टिस करत होती. तिच्या घटस्फोटानंतर ती तिच्या ७ वर्षांच्या मुलीसह - थाओसह ग्रीनव्ह्यू अपार्टमेंट्समध्ये नुकतीच राहण्यास आली होती. मुलगी पहिलीत गेल्यामुळे शाळेसाठी तिने स्कूल बस लावली होती. थाओ शाळेतून घरी यायच्या वेळेस म्हणजे साडेतीन वाजता ती बरोबर घरी आलेली असायची. अपार्टमेंट मधली इतर बरीच मुले पार्कडेल एलिमेंटरी ह्या शाळेतच जात असल्याने ती सर्व एकाच स्कूल बसने यायची. बस यायच्या वेळेला अपार्टमेंटच्या गेटजवळ सर्व छोट्या मुलांचे पालक त्यांना उतरवून घ्यायला तिथे हजर असायचे. त्यामुळे सेनची थोड्याच दिवसात बऱ्याच जणांशी ओळख झाली. त्यांच्या कम्युनिटीमध्ये व्हिएतनामी, थाई, चीनी अशा आशियाई लोकांचा भरणा होता. त्यामुळे ती एकल पालक असून सुद्धा लवकर स्थिरावली.

त्या दिवशी ती नेहमीप्रमाणेच म्हणजे थाओची शाळा सुटायच्या २०-२५ मिनिटं आधी ऑफिसमधून निघाली. तिचं ऑफिस पर्लब्रूकच्या डाऊनटाऊन मध्ये होतं. ती फ्रीवेवर पोचली आणि थोडं अंतर पुढे जाते तोच काही क्षणांत पुढच्या काही गाड्यांनी कचाकच ब्रेक मारले आणि मोठा आवाज झाला. तिनेही घाबरून ब्रेक मारला आणि गाडी थांबवली. काही कळायच्या आत समोरच्या २ गाड्यांतून धूर येत असलेला तिने बघितला. समोर ४ गाड्या एकमेकांवर आपटल्या होत्या. नशिबाने सेनची गाडी, त्या गाड्या पासून सुरक्षित अंतरावर होती. पण पुढच्या गाड्यांमधून काही माणसं पटापट बाहेर येताना दिसली. एका बाईने तिच्या मुलीला गाडीतून झर्रकन बाहेर ओढलं व तिला घेऊन ती शेवटच्या लेनकडे धावत सुटली. तिच्या मुलीला सुरक्षित ठिकाणी ठेवून ती पुन्हा गाडीतले सामान काढण्यास गेली. त्या गाड्यांनी तीनही लेन्स अडवल्या गेल्या. सर्व ट्रॅफिक जॅम झाला. थोड्याच वेळात पोलीस, ॲम्ब्युलन्स आणि फायर ट्रकही आले. आधी कोणी जखमी आहे का, गाडीत अडकले आहेत का ह्याचा शोध घेतला गेला. एक एक करत ॲक्सिडंटचे सर्व प्रोटोकॉल पार पडले. त्यात बराच वेळ जात होता. एव्हाना सेनचं लक्ष घड्याळाकडे लागून राहिलं होतं. आज घरी वेळेत पोहोचू शकत नाही ह्या विचाराने ती अस्वस्थ झाली. तिच्या मुलीकडे फोन नसल्याने तिला काहीच कळवता येत नव्हतं. इतर लोकांशी नुसती तोंडओळख झाली होती पण अजूनपर्यंत कोणाचा फोन नंबर वगैरे तिने घेतलेला नव्हता. थाओ स्कूल बसमधून खाली उतरल्यावर तिला शोधेल आणि ती न दिसल्यावर घाबरून रडायला लागेल का, स्कूल बसचा ड्रायव्हर थांबेल का, ती इतर कोणत्या मुलीच्या आईशी बोलेल का अशा अनेक प्रश्नांनी तिला भंडावून सोडलं. तिला गाडी वळवून दुसऱ्या रस्त्याने पण जाता येत नव्हतं. तिच्या मागे गाड्यांची रांगच रांग लागली होती. एव्हाना टो-ट्रक येऊन पुढच्या गाड्याना रस्त्याच्या बाजूला करायचं

काम सुरु झालं होतं. उलट सुलट विचारांनी सेनचा जीव वरखाली होत होता. ह्या सर्व सोपस्कारांत साधारण ४० मिनिटं गेली असतील. शेवटी एकदाचा तो रस्ता मोकळा झाला आणि सेन हुश्श करून घरी जायला निघाली.

ती अपार्टमेंटच्या गेटपाशी पोचली, तिने तिथेच गाडी पार्क केली व झटदिशी ती दार उघडून बाहेर पडली. तिची नजर थाओला शोधत होती. बघते तर काय, गेटपाशी फूटपाथवर थाओ अगदी निवांत बसली होती व तिच्या शेजारी एक बाई पण बसली होती. थाओ जराही घाबरलेली किंवा काळजीत नव्हती. ती बाई तिच्याशी हळूहळू काहीतरी बोलत होती व अतिशय प्रेमाने तिची विचारपूस करत होती. सेनला त्या बाईला बघितल्याचं अंधुकसं आठवायला लागलं. अर्थातच ती तिच्या कॉम्प्लेक्समधलीच होती. साधारण चाळीशीची वाटत होती. ती रोज स्कूल बस यायच्या वेळेस गेटवर यायची हे तिला आठवलं.

तेवढ्यात थाओने सेनला बघितलं. ती “ममा!” असे म्हणत हसत हसत उठली व धावत येऊन सेनला मिठी मारली. सेनने देखील तिला कडकडून मिठी मारली. तिने पटापट तिचे मुके घेतले. तिला खूप हायसं वाटलं. आपली आई रडत आहे हे बघून थाओला मात्र क्षणभर काही सुचलं नाही.

"ममा, तुला ऑफिसमधून यायला उशीर झाला का आज? पण मी ह्या आँटीजवळ बसून होते तुझी वाट बघत." थाओने आईची काळजी दूर करायचा प्रयत्न केला.

इतक्यात ती बाई पण उभी राहिली. सेन तिच्याशी बोलायला आली. तिने तिला 'थँक यू' व 'सॉरी' म्हटलं. रस्त्यातल्या ॲक्सिडंट बद्दल सांगितलं. ॲक्सिडंटमुळे एवढा वेळ जाईल, ह्या शक्यतेचा तिने कधी विचारच केला नव्हता असं म्हणाली. तिला पुन्हा असा लेट होणार नाही असं खात्रीनं सांगितलं. परत एकदा 'थँक यू' म्हणून तिचं नाव विचारलं. एकदम काहीतरी लक्षात येऊन ती कोणत्या अपार्टमेंटमध्ये राहते ते विचारलं.

त्यावर ती बाई “इंतिरा, अपार्टमेंट नंबर १२४” असं म्हणाली व इतर काहीही न बोलताच ती तिथून जाऊ लागली. सेनला तिच्या डोळ्यांत एक प्रकारचं कारुण्य दिसलं. मगाशी अगदी आपुलकीने थाओशी बोलणारी ती बाई आता थाओला सोडून जाताना कापरी झाली होती. सेन, माणसांचे डोळे आणि त्यावरून त्यांचं मन वाचण्यात पारंगत होती. तिचं कुतूहल चाळवलं गेलं. मनाशी काहीतरी ठरवून ती थाओबरोबर घरी आली.

**क्रमशः**

**अमित भावे**
amit_bhave@hotmail.com

## माझे मोरपीस

शेवटी मला माझे मोरपीस परत मिळालेच. भुमीवर लावले म्हणून काय झाले. माझी भूमी म्हणजे मीच ना. जी किती योजने अशीच पडून होती, अनभिज्ञ होती. कोणी तिची दखल घेण्यापेक्षा त्या भोवतीच्या वादाच्या भोवऱ्यात लोकांची मने गुरफटी गेली होती. हे सगळे पाहून मला राहून राहून महाभारताच्या युद्धाची आठवण होत होती. धर्मनिती, राजनिती त्या सगळ्यांसाठी जरी ते युद्ध होते तरी तेच सगळ्यांच्या विनाशाचे कारण ठरले होते. तेच माझ्या व्दारकेच्या विनाशाचे पण कारण ठरले होते. कौरववंशाचा नाश झालेला पाहून, गांधारीने मला माझ्या यदूवंशाचा नाश होईल हा शाप दिला होता. कर्म कुणाला चुकले नाही.

‘जरा’ या शिकाऱ्याला वाटले की त्याच्या बाणाने माझा वध झाला, त्याला तो तरी काय करणार, ते कर्मविपाकच होते, विधीलिखितच होते. ते तसेच घडायचे होते. अर्जुनाने नंतर माझ्या आणि बलरामाच्या कलेवरला अग्नि दिला तेव्हा माझे हृदय शाबूत होते. ते तेव्हापासून आपल्या जिवंतपणाची ग्वाही देत होते. ते अगदी आतापर्यंत.



कधी पूरीच्या लोकांना त्याचा प्रत्यय यायचा तर कधी वृंदावनाच्या लोकांना.

तरी माझी द्वारका ती माझीच व्दारका. किती प्रेमाने तिची उभारणी केली होती. सोन्याची व्दारका म्हणून अख्या जगतात ती प्रसिद्ध पावली होती.

खुद्द विश्वकर्माने तिची उभारणी केली होती. तिची अशी गती व्हावी की सगळ्या जगताला ती परकी झाली.

आता रामानंतर कृष्णाला यायचेच होते. त्याला त्याच्या सगळ्या विखुरलेल्या गोष्टींची जमवाजमव करायची आहे. तेव्हा परत राजनितितल्या माणसाने जेव्हा स्वतः येऊन माझ्या भूमीची पूजा केली आणि माझे मोरपीस परत माझ्या डोक्यात म्हणजे माझ्या भूमीत रोवले तेव्हा मी धन्य झालो. राजनीतीमुळेच अवकळा आली होती आणि आता तिला राजनितीमुळेच परत कळा प्राप्त व्हायला लागली आहे.

जरी माझे हृदय शाबूत राहिले तरी बाहेरच्या अंधाधुंदीत त्याचे ठोके लोकांना समजतच नव्हते. आता असे वाटते की त्या अंधाधुंदिची धुळ विरळ होत चालली आहे.



सुदर्शन सेतू भक्तगणांमधले अंतर कमी करेल. माझेच गतकर्म संपत आले आहे असे वाटत आहे. थोडयाच दिवसात माझ्या म्हणून गणल्या गेलेल्या गोष्टींची जुळवाजुळव नक्की होईल. परत माझ्या व्दारकेचा नकाशा जगाला दिसेल तेव्हा मी पण तिथेच असेन.

**उत्तरा भालेराव, टॅम्पा फ्लोरीडा**
uttarab@hotmail.com

# BMM - तत्वज्ञान

## शनिवार, २९ जुन २०२४

### प.पू. स्वामी गोविंद देव गिरी महाराज
### भारतीय संस्कृती - मराठी अभिव्यक्ती

महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण भारतीय संस्कृतीच्या पुनरुत्थानात मराठीचे काय स्थान आहे आणि एकंदरीतच खरी भारतीय संस्कृती काय आहे हे आपल्या मनावर बिंबावे यासाठी हा प. पू. गोविंद देवगिरी महाराजांचा वाग्-यज्ञ !! तुम्हीही जरूर या आणि आपल्या संस्कृतीशी आपली नाळ अजून घट्ट करा !!!

### तत्वज्ञान - परिसंवाद


आजच्या आधुनिक युगात तत्त्वज्ञानाचे पर्यायाने परमार्थाचे स्थान, त्याचा मूळ उद्देश, आपल्या वैयक्तिक आयुष्यात असलेले त्याचे महत्व, त्याची जीवनाभिमुखता, पारमार्थिक जीवन जगून आपण काय कमावतो अन्यथा काय गमावतो इत्यादी अत्यंत मुलभूत विषयांना स्पर्श करणारा **दोन दिग्गजांमधील** परिसंवाद !!!

भारतीय तत्वज्ञान

## शाश्वत आनंदाचा धर्म..!

We cater to Maharashtrian Artists in North America.
Providing a platform to share their artwork including Paintings, Sketches, Photographs & Digital art.

Collaborating with BMM, we publish artist's paintings for Marathi mandal members, showcasing their work & generating revenue. The sale of artwork benefits both BMM & Mandals financially.




**Lavendar Meadows**
Artist: Sonal Mohile
Dimension: 8″ x 10″
Medium: Gouache
Price: $30
Mandal: MKMDC



**Doli Kahar**
Artist: Meghana Munj
Dimensions: 12″ x 18″
Medium: 300gsm Acrylic colors using traditional nib/brushes
Price: $150
Mandal: MMK Washington DC




**Ashtavinayak**
Artist: Priyanka Patil
Dimensions: 16″ x 20″
Medium: Acrylic
Price: $50
Mandal: non-member



**Warmth of the first rays**
Artist: Mangala Tata
Dimensions:15″ x 22″
Medium: Watercolor
Price: $300
Mandal: MMLA



**Pink Lotus**
Artist: Medha Atre-Kulkarni
Dimensions: 12″ x 16″
Medium: watercolor on paper
Painting: $500 (Print available)
Mandal: Marathi Vishwa NJ



**Shiva with 7 Chakras**
Artist: Shweta Borade
Dimension: 24″ x 36″
Price: $250
Mandal: Hastakala LLC

Pay: zelle@bmmonline.org or paypal@bmmonline.org | Contact: artists@bmmonline.org
Buyers & Sellers Pl fill out forms at https://bmm2.page.link/artists
*Buyer is responsible for shipping and handling.